कार्यालय : वि.जि.स.क.अ.
नागपूर
आवक क्र. ५५८९
दिनांक 29 DEC 2006
वि.जि.स.क.अ. अधिक्षक

(३)

**गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक - विघयो-२००५/ प्र.क्र. १५१ /मावक-२
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २३ नोव्हेंबर, २००६.

वाचा : १) शासन निर्णय, सामाकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक - विघयो-१०९७/प्र.क्र.१७५/मावक-२, दिनांक ३१ डिसेंबर १९९७

**प्रस्तावना** :- महाराष्ट्र राज्यामध्ये चामड्याच्या वस्तु व पादत्राणे दुरुस्तीच्या क्षेत्रात मोठया प्रमाणावर अनुसूचित जातीच्या व्यक्ती असून त्यांच्या उपजिवीकेचा प्रश्न यांच्याशी निगडीत आहे. या पादत्राणे दुरुस्त करणारे व्यावसायिक हे रस्त्याच्या कडेला उन्हापावसात बसून आपली सेवा देत असतात. ज्या व्यावसायिकांना ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण मिळावे तसेच त्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी ग्रामपंचायत ,नगरपालिका क्षेत्रात १००% शासकीय अनुदानावर गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना शासन निर्णय दिनांक ३१ डिसेंबर १९९७ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजना सन २००२-०३ पर्यंत शासनामार्फत राबविण्यात येत होती. सन २००३-०४ पासून ही योजना संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मुंबई मार्फत राबविण्यात येत होती. तथापि, सन २००३-०४ व २००४-०५ या वर्षामध्ये महामंडळामार्फत सदर योजना राबविण्यात आलेली नाही. त्यामुळे सन २००५-०६ पासून ही योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहे. तथापि, शासनामार्फत सदर योजना राबविण्यामध्ये अडचणी आल्याने ही योजना पुन्हा सन २००६-०७ पासून संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई मार्फत राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :- गटई कामगारांना ऊन,वारा, पाऊस यापासून संरक्षण मिळावे, तसेच त्यांची आर्थिक उन्नती व्हावी याकरीता ग्रामपंचायत व नगरपालिका क्षेत्रात १००% शासकीय अनुदानातून गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना शासन निर्णय क्रमांक विघयो २०९७/प्र.क्र.१७५/मावक २, दिनांक ३१.१२.१९९७ अन्वये राबविण्यात येत आहे. सन २००६-२००७ पासून ही योजना संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांच्यामार्फत राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

२. गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल्स देण्याच्या योजनेच्या नियम व अटी शासन निर्णय दिनांक ३१.१२.१९९७ सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

३. सदर योजना राबविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याबाबत गटई स्टॉलचा पुरवठा करण्याकरीता मॅन्यूअल ऑफ ऑफीस प्रोसिजर फॉर पर्चेस ऑफ स्टोअर्स बाय द गव्हर्नमेंट डिपार्टमेंट (पर्चेस मॅन्युअल) मधील तरतुदीनुसार पुरवठादाराकडून जाहिर निविदा मागविण्यासाठी जाहिरात

देण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांनी तात्काळ कार्यवाही करावी. निविदेमध्ये ज्या अटी व शर्ती टाकावयाच्या आहेत त्या महामंडळानेच निश्चित कराव्यात.

२) निविदा प्राप्त झाल्यानंतर त्या निश्चित करण्यासाठी उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २ जानेवारी, १९९२ च्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार गटई स्टॉल खरेदी करण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली खरेदी समितीची स्थापना करण्यात यावी. या समितीमध्ये मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेचा सहसंचालक / उपसंचालक, लेखाधिकारी, उप सचिव, उद्योग विभाग यांचा समावेश असावा. नियमानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करुन व निविदा अंतिम करुन पुरवठादार निश्चित करावा व या पुरवठादारास गटई स्टॉल पुरवठा करण्याचे काम देण्यात यावे.

३) सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हयातील गटई स्टॉल पुरविण्यासाठी शासन निर्णय दिनांक ३१ डिसेंबर, १९९७ मधील तरतूदीनुसार लाभार्थींची निवड करुन त्यांची यादी संचालक, समाजकल्याण, पुणे यांच्याकडे पाठवावी व संचालक, समाजकल्याण, पुणे यांनी सर्व जिल्हयांची एकत्रित यादी व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडे पाठवावी. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्या मागणीनुसार महामंडळाने गटई स्टॉल विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना पुरवावे. लाभार्थ्यांना गटई स्टॉलचे वाटप विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी करावे.

४) लाभार्थींची संख्या विचारात घेऊन व त्यानुसार एकत्रित प्रस्तावांचा विचार करुन आवश्यक असलेल्या रक्कमेची मागणी व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांनी संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सादर करावी.

५) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांच्या मागणीनुसार आवश्यक तो निधी सन २००६-२००७ च्या या योजनेसाठी मंजूर असलेल्या तरतूदीमधून त्यांच्याकडे सुपूर्द करावा.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक २००६११२३१६२९१२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( नं.मा.शिलवंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति-
व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)(लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
निवासी लेखा परीक्षक, मुंबई/अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सामाजिक न्याय विभागातील सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी
निवड नस्ती, मावक २